Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0025

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# भारतीय नाणेशास्त्राचा इतिहास

**डॉ. विलास आत्माराम देऊलकर**
सहयोगी प्राध्यापक
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला
जिल्हा - सिंधुदुर्ग पिन नं. ४१६ ५१६
इमेल - vadewoolkar@gmail.com

## सारांश

इतिहासाच्या प्राचीन घटनांची माहिती सांगणाऱ्या अनेक साधनांपैकी नाणी हे महत्वाचे साधन आहे. नाण्यावरुन त्या काळातील वैभव, रुढी, परंपरा, अर्थव्यवस्था यांची माहिती मिळते. सुरुवातीच्या काळात नाणेशास्त्र म्हणजे नाण्यांचा संग्रह करणे असा अर्थ मर्यादित होता. पुढे या मर्यादित अर्थाचे विश्लेषण होवून जुन्या नाण्यांचा अभ्यास असा अर्थ रुढ झाला. ऐतिहासिक संशोधनाच्या या शाखेचा विकास होत गेला. त्यामुळे प्राचीन काळातील माहितीचा खजिना इतिहासाच्या अभ्यासकांना ज्ञात झाला.

**मुख्य शब्द -** भारतीय, नाणेशास्त्र, अर्थव्यवस्था, इतिहास

**प्रस्तावना -**

काही वेळा इतिहास आणि संस्कृतीच्या अभ्यासात नाण्यांचे महत्व असाधारण ठरते. कारण देशाच्या विविध भागात विविध काळात प्रचलित असलेली चलने, धातुशास्त्रातील प्रगती व कलात्मकता इत्यादी बाबींविषयी माहिती आपणास नाण्याद्वारे मिळते. विशेषत: विविध राजवंशांचे कालखंड नाणी या साधनामुळे निश्चित करता येतात. एवढेच नव्हे तर ऐतिहासिक साधनांच्या अभावी जो इतिहास अज्ञात आहे अशा इतिहासाची माहिती आपणास नाण्यामुळे मिळू शकते. इतर साधनाद्वारे जमा झालेली ऐतिहासिक माहिती काही वेळा नाणेशास्त्राच्या अभ्यासाने निश्चित केली जाते. पुराणकालीन इतिहासाच्या पुनर्बांधणीसाठी नाणी हे इतिहासाचे साधन महत्वाची भूमिका पार पाडते. नाणेशास्त्राने अत्यंत महत्वाची ऐतिहासिक माहिती उपलब्ध करुन भारतीय इतिहासामध्ये मोलाचे काम केलेले आहे.

**भारतीय नाणेशास्त्राची सुरुवात -**

काळाच्या ओघात मानवाचा विकास होवून जगाच्या विविध भागात मानवी संस्कृती अस्तित्वात आल्या. मानवाच्या कृतीत सुधारणा होत गेल्या. सुरुवातीच्या काळात मानव आणि त्याच्या गरजा मोजक्या आणि मर्यादित होत्या. त्याचे कुटुंब लहान होते. मात्र पुढे मानवाच्या उत्क्रांती बरोबर समाज मोठा होवू लागला व त्याचा इतर जमातींबरोबर संपर्क येवू लागला. त्यामुळे मानवाने तयार केलेल्या साहित्याची तो आपआपसात देवघेव करु लागला. त्याचा परिणाम म्हणजे ही पद्धत प्रथम परस्पर सामंजस्याने बनली व कालांतराने त्याचे रुपांतर वस्तू विनिमय पद्धतीमध्ये झाले. मालाच्या बदल्यात माल दिला जावू लागला. पुढे मात्र मालाचे मूल्य समजून वस्तूची देवाणघेवाण करण्याच्या पद्धतीला वेगळे स्वरुप आले.

अगदी सुरुवातीला ही वस्तू विनिमय पद्धती अतिशय उपयुक्त ठरली. पण लवकरच या पद्धतीचे दोषही लक्षात आले.वस्तू आणि वस्तू विनिमयाची एक नवीन पद्धत उदयास आली. या पद्धतीनुसार प्रथमत: सर्व वस्तूंची किंमत ही एका विशिष्ट वस्तूद्वारे ठरविण्यात आली. पण याच्या पुढच्या टप्प्यात काही विशिष्ट वस्तू हे

देवघेवीचे माध्यम ठरले. हे माध्यम सर्वांना उपयुक्त ठरेल असे बनले. या माध्यमाची किंमत ही इतर वस्तूंच्या अनुषंगाने ठरविण्यात आली आणि हे माध्यम नाण्यांच्या विकासातील महत्वाचा टप्पा ठरला.

**देवघेवीचे माध्यम -**

सुरुवातीच्या काळात शेतीची उत्पादने हीच देवघेवीची साधने म्हणून उपयोगात आणली जात होती. वैदिक काळात गाईंची देवघेव करुन व्यवहार केले जात होते. पुढे ब्राम्हण काळात गाय हेच देवाण घेवाणीचे प्रमुख साधन म्हणून उपयोगात आणले जात होते. एवढेच नव्हे तर गाईंना शेती उत्पादनापेक्षा स्थिर किंमत मानली जात होती. कारण गाईंचा उपयोग बहुउद्देशिय होता. शेती कामासाठी तिच्या पैदासीचा व अन्न म्हणून दुधाचाही उपयोग होत होता. मात्र नंतरच्या विकास टप्प्यामध्ये हा प्राणी व शेतीउत्पादने यांची देवघेव पद्धती निरुपयोगी वाटू लागली. कारण मानव दुर्मिळ अशा हिरे, माणके किंवा धातूचे तुकडे यांचा माध्यम म्हणून देवघेवीसाठी उपयोग करु लागला.

खुद्द वेदामध्ये सुद्धा आपणाला सुवर्ण अलंकारांचा उल्लेख आढळतो. हे सुवर्ण अलंकार जरी शरीराची शोभा वाढविण्यास वापरता येत असले तरी पुढे मात्र देवघेवीचे माध्यम म्हणून चलनासारखा त्यांचा उपयोग होवू लागला. ऋग्वेदात हिरण्यपिंड नावाचा शब्द आलेला आहे. ' हिरण्यापिंड ' म्हणजे सोन्याचा तुकडा. याचा चलनासारखा वापर केला जात असे. रामायण, महाभारतासारख्या महाकाव्यातही हिरण्य व सुवर्ण हे देवघेवीचे साधन म्हणून वापरले जात असल्याचा उल्लेख आहे. निष्क (सुवर्णनाणी) मान आणि पाद हे चलनाचे इतर प्रकारही वैदिक वाङ्मयात उल्लेखिले गेलेले आहेत.

**भारतीय नाणेशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात -**

भारतामध्ये नाण्यांचा विकास झालेला होता. त्यामुळे व्यवहारिकदृष्ट्या सुलभता येण्यासाठी या व्यवस्थेचे संशोधन होणे क्रमप्राप्त होते. तसेच इतर सुधारणा झाल्यामुळे ही नाणी अविकसित राहू शकत नव्हती. कोणत्याही व्यवस्थेचा, विभागाचा अभ्यास तार्किक पद्धतीने केल्यास त्यास शास्त्राचे स्वरुप प्राप्त होते. नाणेशास्त्राचा इतिहास सन १७८४ मध्ये स्थापन झालेल्या एशियायाटिक सोसायटीच्या स्थापनेपासून सुरू होतो. नाण्यांविषयी प्रयत्नपूर्वक माहिती घेवून या व्यवस्थेचा सर्वांगिण अभ्यास म्हणजे नाणेशास्त्र होय. १८ व्या शतकात नाण्यांचे महत्व लक्षात घेवनू इतिहासाचे एक साधन म्हणून या नाणेशास्त्र विदयाशाखेकडे पाहिले जावू लागले. केवळ छंद म्हणून नाण्यांचा संग्रह करण्याचे दिवस मागे पडले व नाण्यांचा अर्थ, मूल्य म्हणून त्याकाळातील नाणेशास्त्राचा अभ्यास सुरू झाला.

वास्तविक पाश्चात्य देशातसुद्धा धातूची चलनपद्धती इ. स. पूर्व ८०० च्या सुरू झाली. पाश्चात्य जगात इतिहास आणि संस्कृतीचे साधन म्हणून १५ व्या शतकात उपयोग सुरू झाला. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीस नाणेशास्त्र ही नाण्यांचा अभ्यास करणारी स्वतंत्र शाखा बनली. जगातील पहिली नाणकशास्त्र संस्था इंग्लंडमध्ये २२ जून १८३६ मध्ये स्थापन करण्यात आली व सन १९०७ मध्ये तिचे 'न्युमिस्मॅटिक सोसायटी' असे नामकरण करण्यात आले. इंग्रज भारतामध्ये राज्य करीत होते. त्यांनी आपल्या मायदेशातून या शास्त्राची माहिती घेवून प्रत्यक्ष भारतभूमीवर विकास करण्याचे महत्वाचे काम केले. भारताच्या नाणेशास्त्राच्या विकासाचे अनेक टप्पे आहेत.

**नाणेशास्त्र विकासाचा पहिला टप्पा :- (१७८४-१८५०)**

या टप्प्यामध्ये युरोपमधील बुद्धीमंत मॉनेट व व्हीस कोंटी यांनी वेगवेगळया भारत ग्रीक नाण्यांचे संशोधन सुरू केले. रॉयल एशियाटिक सोसायटीने ग्रीक पर्शियन व भारतीय ताम्रपट यांच्यावर कोरलेल्या ठशांचा अभ्यास केला. निश्चित प्रयत्नामुळे मथुरा व इतर भागातील शहरामध्ये हजारो नाण्यांचा शोध घेण्यात आला. त्यामध्ये २०,००० छिद्र असलेली ठशांची नाणी सापडली. नाण्यांचा अभ्यास इतिहासाच्या दृष्टीने एक

शास्त्र म्हणून केला पाहिजे असा विचार विल्यम गिल यांनी मांडला. सन १८३० मध्ये जनरल व्हेंन्च्यूरा याने भारतातील बॅक्ट्रियिन व नाण्यांचा संग्रह करुन त्याचे संशोधन केले. सन १८३४ ते सन १८३६ च्या दरम्यान चार्लस मेनन याने भारतातील नाण्यांच्या संशोधनाची तीन प्रकाशने प्रसिद्ध केली. या संशोधनातूनच जेम्स प्रिन्सेप याला अशोकालीन ब्राम्ही लिपीच्या वाचनाची गुरूकिल्ली सापडली. तथापि सन१८५० पर्यंत नाणेशास्त्राच्या संशोधनाची प्रगती मर्यादित होती.

**नाणेशास्त्राच्या विकासाचा दुसरा टप्पा :- (१८५० ते १९००)**

हा टप्पा नाणेशास्त्राच्या संशोधनाच्या प्रगतीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा ठरला. या टप्प्यात नाण्यांचे वर्गीकरण व तालिकिकरण करण्यात आले. नाण्यांवरील लेखांचे वाचन आणि संशोधन करण्याच्या कामास अग्रक्रम देण्यात आला. त्यामुळे नाणेशास्त्रास ऐतिहासिक संशोधनाच्या क्षेत्रात महत्वाचे स्थान प्राप्त झाले. अलेक्झांडर कॅनिंगहॅम यांनी नाणेशास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास करुन अनेक पुस्तके लिहिली. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत :

१) द कॉईन्स ऑफ अलेक्झांडर सक्सेसर्स इन द ईस्ट (१८७३)
२) कॉईन्स ऑफ इंडो सामयथियन्स (१८९२)
३) कॉईन्स ऑफ एन्शियन्ट इंडिया (१८९४)
४) कॉईन्स ऑफ मेडिएबल इंडिया (१८९४)
५) कॉईन्स ऑफ लॅटर इंडो सामयथियन्स (१८९५)

या विविध पुस्तकातून त्यांनी अद्ययावत व तुलनात्मक संपूर्ण भारत वर्षातील नाणेशास्त्रचा आढावा घेतला आहे. या संशोधकाने परिश्रमपूर्वक केलेल्या कष्टाने अनेक निष्कर्ष काढले व ते निष्कर्ष प्राचीन भारताचे आधार म्हणून मानले जातात. याच कालखंडात दक्षिण भारतातील नाणी व भारतीय नाणी ही पुस्तके भगवानलाल इंद्रजी, रॅमसन, इलिएट यांनी लिहिली व दक्षिण व उत्तर भारताच्या नाणे संशोधनाचा पाया भक्कम केला.

**नाणेशास्त्राच्या विकासाचा तिसरा टप्पा :- (१९०० ते १९४०)**

या टप्प्यात नाणेशास्त्र विषयाच्या अभ्यासाला एक वेगळे वळण मिळाले. नाणेशास्त्राचा समावेश असलेल्या पुरातत्व शास्त्राच्या संशोधनासाठी स्थापन झालेल्या पुरातत्व सर्वेक्षण विभागावर सरसंचालक म्हणून लॉर्ड कर्झन यांनी सर जॉन मार्शल यांची नेमणूक केली. या टप्प्यात व्हिनसेट स्मिथ, जॉर्ज मॅकडोनाल्ड, जॉन ॲन व व्हाईटरेड यांनी सुद्धा महत्वाचे योगदान दिले. सर मार्शल यांनी भारतात पुरातत्विय उत्खननास सुरुवात केली. उत्खननातील नाणी ही विशिष्ट थरात आढळतात. ती नेमकी कुठल्या ठिकाणी किंवा मातीच्या कुठल्या थरात सापडली यांची अभ्यास पूर्ण नोंद करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे स्तर पद्धतीच्या आधारे नाणेशास्त्राचे संशोधन सुरू झाले. सन १९०४ पासून एसिएटीक सोसायटीच्या जर्नलमध्ये नाणेशास्त्राच्या संशोधनासाठी वेगळा उपविभाग निर्माण करण्यात आला. या काळातील आणखी एक उल्लेखनीय घटना म्हणजे सन १९१० साली भारतीय नाणकशास्त्र परिषद सुरू झाली व सन १९२१ पासून नाणेशास्त्र हा विषय भारतातील विद्यापिठामध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रस्तुत करण्यात आला.

**नाणेशास्त्राच्या विकासाचा चौथा टप्पा :- (१९४० - १९५०)**

या आधुनिक काळातील दहा वर्षांत बहुतेक नाणेशास्त्रीय साधनांचा शोध लागला व सर्व संशोधन प्रसिद्ध ही झाले. हे काम नाणेशास्त्र सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या नियतकालिकाने केले होते. तसेच काही ग्रंथ प्रकाशित झाले.

१) द टेक्निक ऑफ कास्टिंग कॉइन्स इन एन्शियन्ट इंडिया - बिरबल सहानी
२) ए होर्ड ऑफ सिल्वर पंचमार्क कॉइन्स फ्रॉम पूर्णीया - बिरबल सहानो
३) न्युमिसमॅटीक पॅरलल्स इन कालिदास - शिवराम मूर्ती
४) कॉईन्स ऑफ मारवाड - बी. एन. रेऊ

या शिवाय या क्षेत्रात सी. आर. सिंघल, ए. एस.आळतेकर , वॉल्श चक्रवर्ती, पी. एल. गुप्ता, बाजपेई आणि डिस्कळकर यांनी शोधनिबंध प्रकाशित केले तसेच डी. डी. कोसंबी यांनी नाण्यांचे वर्गीकरण करण्याचे काम याच टप्प्यात केले.

**नाणेशास्त्राच्या विकासाचा पाचवा टप्पा :- (१९५० नंतरचा काळ)**

स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळात नाणकशास्त्र विषयक संशोधनाचा व्याप विस्तृत करण्याऱ्या अनेक घटना घडल्या. भारतात अनेक विद्यापीठे स्थापन होवून त्यांनी नाणेशास्त्र अभ्यासाचा समोवश आपल्या अभ्यासक्रमात केला. भारतीय पुरातत्विय सर्वेक्षणाप्रमाणे सर्व राज्य सरकारांनी आपआपल्या राज्यात पुरातत्व विभाग सुरू केले व त्यामुळे नाणेशास्त्र अभ्यासाशी संबंधित अनेक गूढ समस्यांचे निराकरण होण्यास मदत झाली. तसेच काही विद्वान संशोधकांनी परिश्रम पूर्वक संशोधन करुन नाणकशास्त्रातील ज्ञानाच्या शाखा विस्तृत केल्या. यामध्ये ए. एस. आळतेकर, सोहनी, के.पी.जयस्वाल. वि.वि. मिराशी, नरसिंहमूर्ती, पी. एल. गुप्ता, के.ए. शर्मा इत्यादी संशोधकांनी या विषयावर नवीन संशोधन करून ग्रंथलेखन केले. श्री. माहेश्वरी यांनी नाणकशास्त्र विषयक शिक्षण आणि प्रशिक्षणास वाहून घेणारी इंडियन इंन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च इन न्युमिस्मॅटिक स्टडीज ही संस्था नाशिक येथील अंजनेरी येथे स्थापन केली.

नाणेशास्त्र हे प्राचीन भारतीय इतिहासाचे एक अत्यंत महत्वाचे आणि विश्वासाई साधन आहे. नाण्यांच्या अभ्यासावरून आपणास बहुमूल्य अशी ऐतिहासिक माहिती मिळते. या माहितीची सुसंगत जुळणी करुन इतिहासाचा अभ्यास करता येतो. भारताच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय इतिहासाची माहिती या नाण्यावरून आपणास मदत होते.

**संदर्भ सूची :-**

१) गुप्ता पी. एल. : कॉईन नॅशन बुक ट्रस्ट नवी दिल्ली १९६९
२) गई जी. एस. : स्टडीज इन इंडियन हिस्ट्री, इपिग्राफी ॲण्ड कल्चर, श्रीहरी प्रकाशन, धारवाड १९९२
३) देव शां.भा. : पुरातत्वविद्या, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे २००८
४) गुप्ता पी. एल. : प्राचीन भारतीय मुद्रांए विश्वविद्यालय प्रकाशन वाराणसी १९८९
५) प्रा. भास्करराव थोरात : वस्तुसंग्रहालयशास्त्र - पुरातत्वविद्या, पुराभिलेख व ग्रंथालयशास्त्र प्राची प्रकाशन मुंबई २००१
६) डॉ. रानडे, डॉ. समेळ, डॉ, नाबर : पुरातत्व परिचय, मनन प्रकाशन मुंबई २०१९